# रात्रशाळांमध्येही ऑनलाइन वर्ग

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

गरीबी वा अज्ञानामुळे जे तरुण शिक्षण प्रवाहातून बाहेर पडले किंवा घरगुती अडचणीमुळे दिवसाच्या शाळेत जाऊ शकत नाहीत अशा विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी रात्रशाळा या हक्काचे व्यासपीठ ठरतात. मात्र, करोनामुळे या रात्रशाळेतील विद्यार्थ्यांनाही सुट्टी देण्यात आली होती. परिणामी, दिवसभर नोकरी करून रात्री शिक्षण घेण्यासाठी धडपड करणाऱ्या या होतकरू विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाण्याची शक्यता निर्माण झाल्याने पालिका शाळांपाठोपाठ रात्रशाळांनीही आपल्या विद्यार्थ्यांसाठी 'ऑनलाइन' मार्ग स्वीकारला आहे.

सरकार, समाज, शिक्षणक्षेत्रापासून काहीअंशी दुर्लक्षित असलेल्या रात्रशाळांतील विद्यार्थ्यांना खासगी शाळांप्रमाणे सुविधा देण्याऱ्या मुंबईतील 'मासूम' या स्वयंसेवी संस्थेकडे जवळपास ऐंशीहून अधिक रात्रशाळांचे पालकत्व आहे. या शाळांमध्ये दरवर्षी नववी इयत्तेतून दहावीत प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी फाउंडेशन कोर्स करून घेतला जातो. यंदाच्या वर्षी मात्र करोनाच्या संकटामुळे विद्यार्थ्यांना फाउंडेशन कोर्सचे शिक्षण देणे शक्य होत नव्हते. आधीच हलाखीच्या परिस्थितीत शिक्षण घेणाऱ्या या विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाण्याची शक्यता होती. अशावेळी ऑनलाइन वर्ग भरवण्याचा पर्याय पुढे आला. मात्र, रात्रशाळांतील सर्व शिक्षक तसेच विद्यार्थी हे डिजिटल व्यासपीठ आपलेसे करतील का याबाबत संस्थेला साशंकता होती. अखेर काही सामाजिक संस्थांच्या सहकार्याने प्रायोगिक तत्त्वावर

## होतकरू विद्यार्थ्यांचे वर्ष वाया न जाण्यासाठी उपाय



ऑनलाइन वर्गांचा प्रयोग राबवण्यात आला. सुरुवातीला दोन तास, त्यानंतर दीड तासाची दोन सत्रे घेण्यात आली

आश्चर्याची बाब म्हणजे, विद्यार्थ्यांकडून खूप छान प्रतिसाद मिळत आहे. मुलांकडून वेगवेगळे प्रश्न विचारले जात आहेत. बहुतांश विद्यार्थी हे झोपडपट्टी भागात राहत असल्याने, छोट्याशा घरात आजूबाजूचा गोंगाट सहन करत हे विद्यार्थी खूप उत्सुकतेने सर्व गोष्टी शिकून घेत आहेत. अनेकदा एका बॅचचे सत्र झाले की, दुसऱ्या बॅचसोबत काही विद्यार्थी पुन्हा सहभागी होतात. आतापर्यंत ५० मुलांकडून हा फाउंडेशन कोर्स पूर्ण करून घेण्यात आला असल्याची माहिती शिक्षक शशिकांत गवस यांनी दिली.

करोनामुळे शाळा कधी सुरू होणार याबाबत स्पष्ट नाही. फाउंडेशन कोर्सच्या निमित्ताने डिजिटल माध्यमाबाबत विद्यार्थ्यांसह शिक्षकांमध्येही आत्मविश्वास निर्माण केला जात आहे. या मुलांचे वर्ष वाया जाऊ नये यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील इतर शाळांमध्ये तसेच इतर भाषांतील शाळांमध्येही हा प्रयोग सुरू करू.

- निकिता केतकर, मासूम संस्थेच्या प्रमुख

### मदतीचे आवाहन

रात्रशाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकडे ऑनलाइन वर्गात सहभागी होण्यासाठी स्मार्टफोन असणे गरजेचे आहे. मात्र, संस्थेत यंदा दहावीची नोंदणी केलेल्या १२५० विद्यार्थ्यांपैकी ८५० विद्यार्थ्यांकडे स्मार्टफोन आहेत. ४००हून अधिक विद्यार्थी स्मार्टफोन नसल्याने या वर्गांना उपस्थिती दर्शवू शकत नाहीत. अशावेळी दानवीरांनी पुढे येण्याचे आवाहन मासूम संस्थेने केले आहे. संपर्क : रामदास ९९६७१३३००१